तहसील कार्यालय, औसा जि. लातूर

# तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी औसा यांचे कार्यालय

(जमाबंदी विभाग दोन )

---

वाचा:- 1. मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे आदेश.जा.क्र.2019/महसूल/जमा-1/डेस्क-1/कावी-157 दिनांक.01/04/2019 .

2. युनीसन एनव्हायरो प्रा.ली.तर्फे अमित कुमार साम रा.लातूर ता.जि.लातूर यांचा विनंती अर्ज दि.18/09/2019 .

3. नगर रचनाकार, लातूर यांचे पत्र जा.क्र. क्र..मौ.चिंचोली काजळे/ता.औसा/स.नं.142/बा.प/ससंनरला/2081 दि.09/12/2019

---

क्र.2019/जमा-2/बांप//कावी-806

दिनांक:- 21 /12/2019.

## / / : : बांधकाम परवाना : : / /

संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये युनीसन एनव्हायरो प्रा.ली.तर्फे अमित कुमार साम रा.लातूर ता.जि.लातूर यांनी या कार्यालयात अर्ज देवून मौ.चिंचोली काजळे ता.औसा जि. लातूर येथील गट क्र.142 मधील क्षेत्र 7110 चौ.मी.जागेत बांधकाम परवाना मिळणे बाबत.विनंती केले नुसार प्रकरणात संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये नगर रचनाकार, लातूर यांनी तांत्रिक मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावीत बांधकाम नकाशासह त्यांचे कार्यालयाचे अभिप्राय सादर केलेले आसून. मौ.चिंचोली काजळे ता.औसा जि. लातूर येथील गट क्र.142 मधील क्षेत्र 7110 चौ.मी.जागेत औद्योगिक बांधकाम नकाशा बाबत त्यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र ..मौ.चिंचोली काजळे/ता.औसा/स.नं.142/बा.प/ससंनरला/2081 दि.09/12/2019 अन्वये अभिन्यासाच्या तात्पुरत्या मंजूरीची शिफारस केलेली असून मा.जिल्हाधिकारी,लातूर यांचे आदेश क्र.2019/महसूल/एनए/जेएमबी-1/डेस्क-१/सीआर-37 दिनांक.29/06/2019 अन्वये सदरील भूखंडाची अकृषी परवानगी देण्यांत आलेली आहे. सदर स.नं.142 मधील क्षेत्र 7110 चौ.मी.ग्राम पंचायत चिंचोली काजळे यांचे हद्दी बाहेरील आहे. प्रस्तावाखालील औद्योगिक वापरासाठीच्या इमारत बांधकामाचे रेखांकन नकाशे सर्वसाधारपणे योग्य असल्याने नगर रचनाकार, लातूर यांनी सदर प्रस्तावीची छाननी करुन खालील अटीस अधिन राहून बांधकाम परवाना देणे बाबत शिफारस केलेली आहे.त्यामुळे मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्र.01 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील अटीच्या अधीन राहून बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

1) प्रस्तावीत वापरामुळे जागेच्या आजुबाजूच्या शेजा-याचे मुलभूत हक्क जसे, वीज., पाणी, हवा, रस्ता इ. बाधा येऊ नये.

2) जागेवर जाणे येणेसाठी पोच रस्ता तयार करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

3) आपल्या छतावरील पाणी जमीनीत मुरविणेकरीता रेन वॉटर हारवॅस्टींगची सोय करुन घ्यावी.

4) सदर जागेत जास्तीत जास्त झाडे लावावयाची आहेत व ती जोपासावयाची आहेत.

5) संडास फ्लॅस पध्दतीचा बांधण्याचा आहे. व ते इतर सांडपाण्यासह ड्रेनेजला रितसर जोडावयाचे आहे. संडास सेप्टीक टॅंक पध्दतीचा बांधण्याचा आहे. व त्याचे पाणी सोक पीटमध्ये मुरविण्याचे आहे. तसेच इतर सांडपाण्याचा निचरा समाधानकारकपणे करणेचा आहे.

6) बांधकाम करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी कडून ना / हरकत घेण्यांत यावे.

7) अग्नीशामन सुविधा विषयी काळजी घेऊन त्यास उपाय योजना करणे बंधनकारक आहे.

8) जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

9) प्रदूषण विभागाचे नाहरकत घेणे बंधनकारक राहील.

10) इमारतीत शक्यतो सौर उर्जाचा वापर करावा.

11) भूकंप रोधक बांधकाम करणेची जबाबदारी आपली राहील. या बाबत स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

# तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी औसा यांचे कार्यालय

(जमाबंदी विभाग दोन )

---

12) जागेवर बांधकाम करतांना बांधकाम साहित्यात फलॉय ॲश विटा व फलॉय ॲश आधारीत साहित्याचा वापर करण्यांत यावा.

13) महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम-1966 प्रमाणे सबंधीत प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी घेणे आवश्यक आहे.

14) जागेवरील बांधकाम नकाशात दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे,नसल्यास नियमानुसार आवश्यक तडजोड शुल्क भरणा करणे बंधनकारक राहील.

15) अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्र वस्तूनिष्ठ नाहीत अथवा चूकीची असल्याचे आढळून आल्यास केलेली शिफारस रद्य समजण्यांत येईल.

संदर्भीय प्रस्तावास नगर रचनाकार, लातूर यांनी शिफारस केल्यानुसार अर्जदारास वरील अटीप्रमाणे बांधकाम परवाना देण्यांत येत आहे.

**(शोभा पुजारी)**
**तहसीलदार,औसा.**

प्रतिलिपी.

1) नगर रचनाकार, लातूर यांना माहितीस्तव देण्यांत येते.
2) तलाठी चिंचोली काजळे यांना माहितीस्तव देण्यांत येते.
3) ग्रामसेवक ग्राम पंचायत कार्यालय चिंचोली काजळे यांना आवश्यक कार्यवाहीस्तव देण्यात येते.
4) युनीसन एनव्हायरो प्रा.ली.तर्फ अमित कुमार साम रा.लातूर ता.जि.लातूर यांना माहितीस्तव देण्यांत येते.

**(शोभा पुजारी)**
तहसीलदार,औसा.

तहसीलदार औसा
जि. लातूर

21/12/19

---



Scanned by CamScanner